महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर–440 001
Email : msboardnagpur@gmail.com

**तातडीचे / परीक्षा पाधान्य**

पत्र कमांकः नाविमं / मागो / 4361
नागपूर, दिनांकः 02/12/2022

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा
नागपूर विभागीय मंडळ, नागपुर
भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया

विषय :– माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च 2023 करीता परीक्षक / नियामकांच्या नियुक्ती बाबतचे पॅनल फॉर्म मंडळात पाठविणेबाबत

संदर्भ :– 1) पत्र कमांक : नाविमं / मागो / 3984 नागपूर, दिनांक 31 / 10 / 2023 परीपत्रक
2) पत्र कमांक : नाविमं / मागो / प्रात्यक्षिक / 3927, नागपूर, दिनांक 20 / 10 / 2022

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च 2023 करीता आपल्या शाळेतील विषय शिक्षकांची नावे मंडळात पाठविण्याबाबत संदर्भिय परीपत्रकान्वये आपणास कळविण्यात आले आहेत. तथापि ब–याच शाळांनी अद्याप सदर पॅनल फॉर्म / प्रात्य परीक्षा अंतर्गत बहिर्गत नावे मंडळास पाठविले नाही.तरी ज्या शाळांनी तात्पुरते नियुक्ती पत्रके / पॅनल फॉर्म मंडळात आजपावेतो जमा केले नाही त्या शाळांनी परीक्षेच्या कामाची / मुल्यांकनाची निकड लक्षात घेता आपल्याकडे असलेले पॅनल फॉर्म (तात्पुरती नियुक्ती पत्रके) मंडळात दिनांक 13 / 12 / 2022 पर्यंत न चुकता प्रत्यक्ष किंवा पोस्टाने पाठविण्यात यावे.

सदर कामाबाबत हयगय व विलंब झाल्यास सर्वस्व जबाबदारी मुख्याध्यापकाची राहील याची नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर